# ब्लेड्स ऑफ ग्लोरी तर्फे शालेय मुलांसाठी 'प्रेरणा' उपक्रमाचे आयोजन

## प्रसिद्ध गोलंदाज ब्रेट ली याच्या हस्ते उपक्रमाचे उद्घाटन

पुणे, 25 सप्टेंबर 2012ः भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील कित्येक क्रिकेटपटूंकडून गौरव, कौतुकास प्राप्त झालेल्या ब्लेड्स ऑफ ग्लोरी या क्रिकेटविश्वाच्या संग्रहालयातर्फे युवा पिढीला प्रेरित करण्यासाठी आता आणखी एका विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. क्रिकेट संग्राहक रोहन पाटे यांनी स्थापन केलेल्या ब्लेड्स ऑफ ग्लोरी या दालनात यामुळे आता एक नवा अध्याय सुरू होणार आहे.

ब्लेड्स ऑफ ग्लोरीतर्फे खास शालेय विद्यार्थ्यांसाठी 'प्रेरणा' या विशेष उपक्रमाची आखणी करण्यात आली आहे. शालेय विद्यार्थ्यांना प्रकल्प भेट (Field Visit) कार्यक्रमांतर्गत या गॅलरीला भेट देता यावी तसेच क्रिकेटशी संबंधित आणि आपल्या आवडत्या क्रिकेटपटूंनी वापरलेले विविध साहित्य जवळून पाहता यावे यासाठी त्यांना या उपक्रमाच्या माध्यमातून प्रोत्साहीत केले जाणार आहे.

प्रेरणा या उपक्रमाचे उद्घाटन आज ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज ब्रेट ली याच्या हस्ते करण्यात आले. या निमित्ताने ब्रेट ली याने ब्लेड्स ऑफ ग्लोरीला दुसऱ्यांदा भेट दिली. यापूर्वी मे 2012 मध्ये आयपीएल सामना खेळण्यासाठी पुण्यात आला असता ब्रेट लीने या गॅलरीचा फरफटका मारला होता. रोहन पाटे यांच्या समवेत कॅम्प मधील सेंट व्हिन्सेंट उच्च माध्यमिक प्रशाला आणि शास्त्रीनगर, येरवडा येथील एस.एन.बी.पी. स्कूल या शाळेचे विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

या संकल्पनेबाबत बोलताना ब्लेड्स ऑफ ग्लोरीचे संस्थापक रोहन पाटे म्हणाले, "क्रिकेट हा भारतात जणू धर्म म्हणूनच गणला जातो. सध्याच्या क्रिकेटप्रेमींना तसेच भावी पिढीला प्रेरणादायी ठरतील अशा महान क्रिकेटपटूंच्या वस्तू, त्यांची माहिती, किस्से एकत्रितपणे संग्रहाच्या स्वरुपात जतन करून ठेवणारी एकही सुविधा आपल्या देशात उपलब्ध नव्हती. ब्लेड्स ऑफ ग्लोरीच्या स्थापनेमागे हीच प्रेरणा असून आज क्रिकेटविश्वाच्या संग्रहालयाच्या स्वरुपात ब्लेड्स ऑफ ग्लोरी नावारुपाला आली आहे."

आपल्या क्रिकेटवेड्या देशामध्ये क्रिकेटपटूंना कित्येकदा अक्षरशः देवाचे स्थान दिले जाते आणि त्यामुळेच युवा पिढीला प्रेरणा देण्यासाठी उपयोग व्हावा हा देखील या उपक्रमाच्या स्थापनेमागचा एक मुख्य हेतू आहे. युवा पिढीलाच डोळ्यापुढे ठेवून आम्ही आज 'प्रेरणा' या उपक्रमाची सुरवात केली आहे. शालेय विद्यार्थ्यांना ब्लेड्स ऑफ ग्लोरी येथे भेट देण्यासाठी प्रोत्साहीत करणारा असा हा विशेष उपक्रम आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त शाळांनी सहभागी व्हावे असेही पाटे यांनी नमूद केले.

प्रेरणा उपक्रमांतर्गत पुण्यातील शालय विद्यार्थ्यांसाठी पुढील तीन महिने एक खास संपर्क अभियान राबविले जाईल. जेव्हा शालेय विद्यार्थी या गॅलरीला भेट देण्यासाठी येतील, तेव्हा त्यांच्यासाठी तयार केलेले एक खास दृक्‌श्राव्य सादरीकरण करण्यात येईल, ज्यामध्ये त्यांना या गॅलरीचे स्वरुप, त्याच्या स्थापनेमागची संकल्पना आणि येथील कलेक्शन विषद केले जाईल आणि त्यानंतर त्यांना या संपूर्ण गॅलरीची एक गाईडेड टूर घडवून आणली जाईल.

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडूलकर, सर व्हिविएन रिचर्ड्स, एम. मुरलीधरन, माल्कम मार्शल, जॅक कॅलिस, ब्रायन लारा, सौरव गांगुली, एम. एस. धोनी, विरेंद्र सेहवाग, राहुल द्रविड, डेसमंड हेन्स, ब्रेट ली यांच्यासारख्या क्रिकेट जगतातील काही महान खेळाडूंशी संबंधित क्रिकेट साहित्य तसेच यांच्याशी निगडित काही संस्मरणीय माहिती, किस्से यांचा या दृकश्राव्य सादरीकरणात समावेश आहे.

या गॅलरीची गाईडेड टूर ही खास प्रशिक्षित मार्गदर्शक व्यक्तींद्वारे घडवून आणली जाईल, दृकश्राव्य सादरीकरणामध्ये दाखविलेल्या गोष्टी, किस्से आणि गॅलरीमध्ये प्रत्यक्ष समोर असलेल्या वस्तू यांची सुयोग्य सांगड घालून रंजक पद्धतीने विद्यार्थ्यांसमोर ते मांडण्याची कामगिरी ते पार पाडतील.

जगातील महान क्रिकेटपटूंच्या गोष्टी ऐकल्यानंतर व त्यांच्या वस्तू अगदी जवळून पाहील्यानंतर निश्चितपणे शालेय विद्यार्थ्यांना एक अनोखा अनुभव मिळेल आणि कदाचित आयुष्यात पुढे जाऊन आपणही असेच महान कार्य करण्याची प्रेरणा त्यांना मिळू शकेल.

ब्लेड्स ऑफ ग्लोरी पाहण्यासाठी सर्वसामान्य प्रेक्षकांसाठी 50 रुपये (15 वर्षे वयापुढे) आणि 25 रुपये (15 वर्षांखालील) तिकीट आकारण्यात येते. तथापि, प्रेरणा उपक्रमांतर्गत शाळांतर्फे आलेल्या शालेय विद्यार्थ्यांसाठी केवळ 10 रुपये तिकीट शुल्क ठेवण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी www.bladesofglory.net

तुषार जोशी 9822057625 / अमित वडाळकर 9881235589